

शिवाजी विद्यापीठ विभागीय बास्केटबॉल स्पर्धेत कमला कॉलेजच्या संघाने १० व्या वर्षी अजिंक्यपद पटकाविले असून हा संघ दि. १७ व १८ ऑक्टोबरला मिरजेत आंतरविभागीय स्पर्धा खेळणार आहे. या संघात तेजस्विनी किल्लेदार, प्रतिभा धार्टुबे, सुचित्रा भोसले, दीपाली कुंभार, वर्षा बकरे, राखी शिवराईकर, विद्या बकरे, हेमलता समुद्रे, फैमिदा देसाई, आश्लेषा देशपांडे यांचा समावेश होता. पुढारी १६/१०/०४

तरुण भारत
२०/१०/०४

आंतरविभागीय टेबलटेनिस स्पर्धेत

## कमला कॉलेजला अजिंक्यपद

कोल्हापूर, दि. १९ - नुकत्याच सांगली येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय टेबलटेनिस स्पर्धेत कमला कॉलेजच्या संघाने सतत ७ वर्षे अजिंक्यपद पटकावले असून, दरवर्षीप्रमाणे या वर्षी कमला कॉलेजच्या दोन खेळाडूंची निवड शिवाजी विद्यापीठाच्या संघात झाली असून कु. गायत्री भागवत व कु. दिपाली भोसले या ग्वाल्हेर येथे आंतरविद्यापीठ टेबलटेनिस स्पर्धेत खेळणार आहेत.

कमला कॉलेजच्या संघाचे नेतृत्व गायत्री भागवतकडे होते. तर ह्या संघात दीपाली भोसले, राजश्री शिंदे, फैमिदा देसाई व शुभांगी डकरे यांचा समावेश होता. तसेच या संघाला प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे बहुमुल्य सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

## आंतर विभागीय टे. टे. : कमला कॉलेज अजिंक्य



कोल्हापूर, दि. १९ : सांगलीत झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय टेबल टेनिस स्पर्धेत कमला कॉलेजच्या संघाने सातव्या वर्षी अजिंक्यपद पटकावले असून यंदाही कमला कॉलेजच्या दोन खेळाडूंची निवड शिवाजी विद्यापीठाच्या संघात झाली आहे. गायत्री भागवत व दीपाली भोसले या ग्वाल्हेर येथे जिवाजी विद्यापीठात होणाऱ्या आंतरविद्यापीठ टेबल टेनिस स्पर्धा खेळणार आहेत. पुढारी २०/१०/०४

कमला कॉलेजच्या संघाचे नेतृत्व गायत्री भागवतकडे होते. संघात दीपाली भोसले, राजश्री शिंदे, फैमिदा देसाई व शुभांगी डकरे यांचा समावेश होता. संघाला प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.